**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग ऑफलाईन सुरु**
**विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग प्रत्यक्षपणे सुरु करण्याबाबत पाचही जिल्हाधिकारी यांनी नुकतीच मान्यता दिली असून त्याबाबतचे पत्र नुकतेच विद्यापीठाला प्राप्त झाले आहे. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील नियमित वर्ग प्रत्यक्षपणे (ऑफलाईन) दि. ८ फेब्रुवारी, २०२२ पासून सुरु करण्यात आले आहेत.

तरी सर्व संबंधित विद्यार्थी, पालक, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक यांनी याची नोंद घ्यावी व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जावून वर्गामध्ये उपस्थित रहावे, अशा सूचना विद्यापीठाकडून देण्यात येत आहे. याशिवाय ज्यांनी कोविडचे दोन डोज घेतले नसतील, त्यांनी दुसरा डोज घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी महाविद्यालयीन विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांचेशी प्रत्यक्ष वा दूरध्वनी क्र. ८३०८८३१३६९ यावर संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०८/०२/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी